# प्रेसनोट

आदेश.क्र.पोउआ/वाहतुक/४५०४/२०१७ पुणे शहर दिनांक १२/१०/२०१७

पुणे शहरातील खडकी वाहतुक विभागाचे हद्दीत बोपोडी ब्रिज येथे सकाळी व संध्याकाळी पिक अव्हर्समध्ये सतत वाहतुक कोंडी होत आहे. वाहतुकीचा बॅक फ्लो भोसरी सी.एम.ई. चौक व फुगेवाडी चौकापर्यत जातो. त्यामुळे वाहतुक मोठया प्रमाणात जाम होते. बोपोडी हॅरिष ब्रिजवर बसेस व जड वाहने बंद पडल्यास, अधिकच वाहतुकीची कोंडी होते. त्यासाठी उपाययोजना म्हणून विभागात सदर मार्गावर वाहतुक कोंडी होते. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मी अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन पुढीलप्रमाणे त्यासाठी उपाययोजना म्हणुन विभागात सदर मार्गावर वाहतुक कोंडी होवु नये यासाठी दिनांक ११/१०/२०१७ रोजी पासुन नगर रोड येरवडा, विश्रांतवाडी, होळकर ब्रिज मार्गे व खडकी बाजार कडुन बोपोडी चौकाकडे जाणारी वाहने ही खालील मार्गाने डायव्हर्शन केल्यास वाहतुकीची कोंडी न होता वाहतुक सुरळित व सुरक्षित चालू राहिल.

१. खडकी बाजारातुन बोपोडी चौकात येणा-या वाहनांना सकाळी ०९.०० ते १२.०० वा.पर्यत व सायंकाळी १६.०० ते २१.०० वा यावेळेत बंदी करण्यात येत आहे.
२. होळकर ब्रीज कडुन बोपोडी चौकाकडे जाणा-या वाहनांनी होळकर ब्रीज टोलनाका येथुन अर्जुन रोड मार्ग - स्टेटबँक - उस्मानमार्ग व मुंबई रोड या मार्गाचा वापर करावा .
३. खडकी बाजार कडुन बोपोडी चौकाकडे जाणा-या वाहनांनी बिझनेस सेंटर येथुन सप्लाय डेपो मार्ग सी.एफ.व्ही.डी सर्कल - फॅक्टरी हॉस्पीटल - चर्च मार्ग मुख्य हायवे या मार्गाचा वापर करावा .
४. पिंपरी चिंचवडकडून येणारी वाहतुक व पुणे कडुन येणारी वाहतुक सदयस्थितीप्रमाणे चालू ठेवण्यात येत आहे.

तरी सर्व नागरिकांनी वाहतुक ड्रायव्हर्शन नुसार मार्गाचा वापर करुन वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे असे आवहान पुणे शहर वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.